आरोग्य अधिकारी कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांक :- एच.ओ./ ६०७२
दिनांक :- ५ /१०/२०२३

## कार्यालयीन परिपत्रक

## इतर खाती व पुणे मनपा सर्व दवाखाने, रूग्णालये

विषय :- सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील कपडे धुलाईबाबत.

संदर्भ :- मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५८८ दिनांक १८/९/२०२३

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडील सर्व दवाखाने,रूग्णालये व इतर खाती ( शिक्षण मंडळ व वाहन व्यवहार खाते सोडून ) कडील सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता बालाजी ईस्त्री आणि धुलाई केंद्र, घाट नंबर २,तकी नंबर१५,अपॉझिट सोनावणे हॉस्पिटल,भवानी पेठ, पुणे-४११००२ प्रोप्रा.श्री.किशोर राम परदेशी ( मोबाईल क्रमांक ८९९९७३६७६३ ) यांचेकडून जीएसटी करासहित प्रति शेकडा १७१२=३५४ या दराने कपडे धुलाईचे काम ( कपडे धुउन व इस्त्री करून देणे ) करून घेण्यास मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ५८८ दिनांक १५ /९ /२०२३ अन्वये १२ ( बारा ) महिने मुदतीकरीता मान्यता प्राप्त झालेली आहे.

तरी या पत्राव्दारे सर्वांना कळविण्यात येते कि सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी दिनांक ६/१०/२०२३ पासून आपले कार्यालयाकडील सर्व प्रकारचे कपडे धुलाईकरीता (खिडक्यांचे पडदे,अभ्रे,नॅपकिन,टेबल क्लॉथ,बेडशीट,रूग्णालयाकडील व दवाखान्याकडील कपडे व इत्यादी ) बालाजी ईस्त्री आणि धुलाई केंद्र, प्रोप्रा.श्री. किशोर राम परदेशी यांचेकडे देण्यात यावे.

कपडे धुलाईच्या कपडयांसाठी नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र रजिस्टर ठेवण्यात यावे तसेच कपडयांची नोंद अक्षरी व अंकी रजिस्टरमध्ये ठेवणे आवश्यक आहे.दर महिन्याला मक्तेदार जे बिल देतील ते रजिस्टरशी रूजवात घालून बिल बरोबर असल्याची खात्री केल्यावर स्वतंत्रपणे बिल तयार करून आपल्या खात्याच्या अर्थशिर्षकावर त्यांचे पेमेंट करण्याची व्यवस्था करावी.

धोबी वेळेवर येत नसल्याचे अगर त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्याबाबत त्यांचेशी वरील पत्त्यावर परस्पर पत्रव्यवहार करावा व त्याची एक प्रत अकौन्टस शिरस्तेदार विभाग ( आरोग्य खाते ) यांचेकडे पाठविण्याची व्यवस्था करावी.

4/10/23

डॉ.संजीव वावरे
सहायक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

4/10/2023

डॉ.कल्पना बळीवंत
प्र.आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

प्रत :- १) सर्व खातेप्रमुख.
२) परिमंडळ १ ते ५
३) इतर खाती